# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 16.08.2026** **वारःरविवार**

1. 80वा स्वातंत्र्यदिन देशभरात उत्साहात साजरा; लाल किल्ल्यावर पहिल्यांदाच 'वंदे मातरम' गीताचं सादरीकरण
2. विकसित भारताच्या उभारणीसाठी सप्तधारा शक्तीची पंतप्रधानांची लाल किल्ल्यावरुन घोषणा
3. विकसित भारताच्या संकल्पनेत महाराष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची- मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन आणि
4. गॉल क्रिकेट कसोटीमध्ये भारताची दमदार सुरुवात; तर विश्वचषक हॉकी स्पर्धेत भारताची विजयी सलामी.

**<u>पंतप्रधान-स्वातंत्र्यदिन</u>**

देशभरात काल 80 वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यदिन सोहळा पार पडला. त्यांच्या आगमनानंतर, लाल किल्ल्यावर पहिल्यांदाच 'वंदे मातरम' हे गीत सादर करण्यात आलं. त्यानंतर लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून पंतप्रधानांनी देशाला संबोधित केलं. एकेकाळी कमकुवत अर्थव्यवस्थांच्या यादीत असलेल्या भारतानं आता जगातील एक प्रमुख आणि सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून स्थान निर्माण केल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचं मोठं उद्दिष्ट भारतानं निश्चित केल्याचं त्यांनी नमूद केलं. विविध क्षेत्रांमधील देशाच्या कामगिरीवर यांनी प्रकाश टाकला.

पुढील एका वर्षात एक कोटी तरुणांना 'एआय' कौशल्यांचं प्रशिक्षण देण्यात येईल, तसंच गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षांचं मोफत ऑनलाइन प्रशिक्षण दिलं जाईल असं त्यांनी सांगितलं.

आपल्या भाषणात पंतप्रधानांनी देशाला 'सप्त धारा' अर्थात शक्तीच्या सात प्रवाहांचा प्रभावी वापर करण्याचं आवाहन केलं. या सात प्रवाहांमध्ये 'उत्पादन क्षेत्र' 'कृषी आणि अन्न उत्पादन', 'तंत्रज्ञान आणि नवोपक्रम', 'गती शक्ती', 'संरक्षण क्षमता', 'हरित अर्थव्यवस्था' आणि 'निळी अर्थव्यवस्था' अर्थात ब्लू इकॉनॉमी आणि 'सॉफ्ट पॉवर' अर्थात सांस्कृतिक आणि वैचारिक प्रभाव यांचा समावेश आहे. सप्तधारांचा उपयोग करण्याचं आवाहन करताना पंतप्रधान म्हणाले...

***मैं आज उस युग को भी याद करना चाहूँगा जब देश भारत का सामर्थ्य सप्त सिंधु के रूप में हम जानते थे, हम समझते थे, हम सुनते थे अब विकसित भारत बनाने के लिए हमें नई धारा चाहिए आज लाल किले की प्राचीर से मैं देश के सामने शक्ति की सप्त धारा का आह्वाहन करता हूँ। आने वाले पाँच-सात साल में जो पिछले पाँच-सात दशक में नहीं हुआ वो सप्तधारा के सामर्थ्य से शक्ति से हम देश को नई ऊँचाई नई गति देंगे और***

***नए लक्ष्यों को पार करने वाला सामर्थ्य देंगे और इसके साथ-साथ देश की युवा शक्ति का सामर्थ्य का भरपूर राष्ट्र निर्माण में उपयोग होगा।***

**राष्ट्रपती-स्वातंत्र्यदिन**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल स्वातंत्र्यदिनानिमित्त राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून वीर जवानांना आदरांजली वाहिली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ, तिन्ही दलांचे प्रमुख आणि संरक्षण सचिव यावेळी उपस्थित होते.

**मुख्यमंत्री**

स्वातंत्र्यदिनानिमित्त मुंबईत मंत्रालयात झालेल्या मुख्य शासकीय समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी स्वातंत्र्यसंग्राम सेनानी, क्रांतिकारक आणि देशाच्या सीमांचं रक्षण करणाऱ्या जवानांना अभिवादन करत राज्यातील जनतेला स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. विकसित भारताच्या संकल्पनेत महाराष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचं 'ग्रोथ इंजिन' असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले...

***महाराष्ट्राचा विकास जो आहे हा सर्वांना सोबत घेऊन कसा करता येईल हा आपला प्रयत्न आहे. मला विश्वास आहे येत्या काळामध्ये देशाच्या प्रगतीत आजही आपला महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे आणि पुढेही देशाच्या प्रगतीतला सर्वात मोठा वाटेकरी आपला महाराष्ट्र असेल आणि म्हणूनच आज आपण सगळे मिळून या आपल्या स्वातंत्र्यदिनी एवढाच निर्धार करूया की सर्वांना आपले अधिकार या ठिकाणी माहिती आहेत जे अधिकार आपल्याला संविधानाने दिले आहेत. पण त्याचवेळी आपण सगळे आपल्या कर्तव्याची आठवण देखील करूया ती कर्तव्य देखील आपल्या संविधानानेच आपल्याला सांगितली आहेत सर्व नागरिक मिळून आपल्या कर्तव्याचं भान ठेवूया आणि आपला तिरंगा हा सदैव उंचच उंच राहील अशा प्रकारचं संकल्प करूया.***

महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास करताना शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्यासोबतच राज्याला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.
समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवणं, हेच विकसित भारताचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजने अंतर्गत 56 लाख शेतकऱ्यांना 36 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात आली आहे. सध्या 76 टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत असून, पुढील वर्षभरात 100 टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

**ध्वजवंदन**

80 वा स्वातंत्र्यदिन काल राज्यात उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. राज्यातल्या विविध जिल्ह्यांमधल्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याचा हा वृत्तांत...

*राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते पुण्यातल्या विधान भवनात ध्वजारोहण झालं. पुणे जिल्हाधिकारी कार्यालय आणि ऐतिहासिक शनिवारवाड्यात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाण्यात तर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते बीडमध्ये ध्वजारोहण झालं. ठाण्यातल्या कार्यक्रमात महिला सक्षमीकरण, महिला यशकथा या विषयावरील 'स्त्री दर्पण' या ई-बुकचं प्रकाशन शिंदे यांच्या हस्ते करण्यात आलं.*

*राज्यातल्या इतर जिल्ह्यांमध्येही पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अभिनव भारत स्मारकाचं लवकरच लोकार्पण करण्यात येईल तसंच वीर प्रेरणास्थळ देखील साकारण्यात येईल अशी घोषणा मंत्री गिरीश महाजन यांनी नाशिकमधल्या कार्यक्रमात केली. रत्नागिरी, अकोला, जळगांव, नवी मुंबई इथं अतिउत्कृष्ट सेवा पदक मिळवलेल्या पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. पुण्यासह भंडारा, सिंधुदुर्ग, सांगली, सातारा, जालना जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. सातारा, अहिल्यानगर, धाराशीव, यवतमाळ, बुलढाणा इथल्या कार्यक्रमात उपस्थितांना जलसंधारणाची तसंच नशा मुक्तीची शपथ देण्यात आली. रायगड जिल्ह्यात देशाचं स्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांचं जतन करण्याचा संकल्प करण्यात आला. सोलापूरमध्ये महापालिकेच्या चार ई बसेसचं उद्घाटन करण्यात आलं. राहुरी इथल्या महात्मा फुले कृषी विद्यापीठात शेतकरी-शास्त्रज्ञ उद्योजक मंचाचा प्रारंभ कुलगुरूंच्या हस्ते करण्यात आला. नंदूरबार जिल्ह्यातल्या शहादा इथली 15 ऑगस्ट सुरू होताच रात्री 12 वाजून 1 मिनिटांनी ध्वजारोहण करण्याची गेल्या 80 वर्षांपासूनची अनोखी परंपरा यंदाही उत्साहात कायम ठेवण्यात आली. पालघर जिल्ह्यातल्या दाभोसा धबधबा इथं उभारण्यात आलेल्या आकर्षक ग्लास स्कायवॉकचं लोकार्पण पालकमंत्र्यांच्या हस्ते स्वातंत्र्यदिनाचं औचित्य साधून करण्यात आलं. तिरंगा रॅली, रक्तदान शिबीर, मॅरेथॉन, देशभक्तीपर गीतं असे विविध कार्यक्रम काल दिवसभर ठिकठिकाणी आयोजित करण्यात आले होते. आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांसह, सुरेखा जोशी, पुणे.*

**<u>महाडीबीटी</u>**

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्तानं राज्य शासनाच्या 29 नवीन योजना काल महाडीबीटीवर उपलब्ध करून देण्यात आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते याचं लोकार्पण झाला. शासनाच्या महाडीबीटीवर नसलेल्या उर्वरित सर्व योजना टप्प्याटप्प्यानं या एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न आहे, त्या माध्यमातून नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेणं अधिक सोपं होईल, असा विश्वास फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. महाडीबीटीवर उपलब्ध योजनांची संख्या आता 105 झाली आहे.

**<u>अदिती तटकरे</u>**

मुलींच्या सक्षमीकरणासंबंधी लेक लाडकी योजना जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी योजनेची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आल्याची माहिती राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. आता आधार क्रमांकाच्या आधारे आवश्यक माहिती संगणकाद्वारे मिळवली जाणार असून लाभार्थी, तिचे माता पिता यांची ई-केवायसी करण्यात येणार असल्यानं वारंवार कागदपत्रं सादर करण्याची गरज नसेल. तसंच पुढील टप्प्यांतील लाभांसाठीदेखील पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही.

**जलसंधारण विभाग**

मातीचं संवर्धन आणि पाण्याचं शाश्वत व्यवस्थापन ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता ती व्यापक लोकचळवळ बनणं ही काळाची गरज आहे. याच विचारातून मृद आणि जलसंधारण विभागाच्या वतीनं राज्यात यंदा 21 ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा दिवस महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी नव्या संकल्पाची सुरुवात ठरेल, असं मृद आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी म्हंटलं आहे. स्वातंत्र्यदिन सोहळ्यात शपथेचं वाचन आणि जलसंधारण अभियानाच्या संकेत चिन्हाचं प्रकाशन करताना ते बोलत होते.

**गिरीश महाजन**

पुढील वर्षी नाशिक आणि त्रंबकेश्वर इथं होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी विविध पायाभूत सुविधांच्या कामात बनावट वर्क ऑर्डर देण्याचा प्रकरणात सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात आणखी 2-3 आरोपी असल्याची माहिती कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी काल नाशिकमध्ये दिली.

**क्रिकेट**

पुरुष क्रिकेटमध्ये, श्रीलंकेतील गॉल आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी भारताच्या 2 बाद 288 धावा झाल्या. देवदत्त पडीक्कल याने नाबाद शतक ठोकलं. तत्पूर्वी, भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दिवसाचा खेळ थांबला त्यावेळी देवदत्त पडीक्कल 131 तर ऋषभ पंत नाबाद 27 धावांवर खेळत होते.

**हॉकी**

विश्वचषक हॉकी स्पर्धेला काल नेदरलँड्समध्ये प्रारंभ झाला. या स्पर्धेतील भारताचा पहिला सामना काल ॲमस्टेलवीन इथं वेल्स संघाबरोबर झाला. या सामन्यात भारतानं वेल्सवर 3-1 अशी मात करत स्पर्धेत विजयी सलामी दिली.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**